# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २१ मार्च, २०१८

## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत)

**(मंगळवार, दिनांक ६ मार्च, बुधवार, दिनांक ७ मार्च, गुरुवार, दिनांक ८ मार्च, मंगळवार, दिनांक १३ मार्च, बुधवार दिनांक १४ मार्च, गुरुवार, १५ मार्च, सोमवार, दिनांक १९ मार्च व मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**ॲड. अनिल परब,** सर्वश्री.प्रसाद लाड, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर, गोपीकिसन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.रविंद्र फाटक, सुजितसिंह ठाकूर, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"मुंबई शहर व उपनगरांचा सन २०१४ ते २०३४ या २० वर्षाचा शासनाकडे प्रलंबित असलेला विकास आराखडा, विकास आराखड्यास मंजूरी न दिल्यामुळे ठप्प झालेली विकास कामे, विकास आराखड्यास त्वरीत मान्यता देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण धोरणास मान्यता देण्यास होत असलेला विलंब, ५०० चौ.फूटापर्यंतच्या मुंबईतील घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतच्या निर्णयास शासनाने त्वरीत मान्यता देण्याची आवश्यकता, मुंबईतील शिवडी, गोराई (बोरिवली), माहिम भागातील जैवविविधतेमुळे पाणथळीने व्यापलेले क्षेत्र पर्यटन क्षेत्र, म्हणून जाहिर करण्याच्या जिल्ह्याधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना, तथापि जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे पाणथळ क्षेत्रांवर दिवसेंदिवस वाढत जाणारी अनधिकृत बांधकामे, मुंबई शहर व उपनगरातील विकासक, मोठमोठ्या कंपन्या, मॉल्स यांनी महापालिकेचा सुमारे १३३.२५ कोटी रुपयांचा थकवलेला कर, विविध शासकीय कार्यालयांनी ३२० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेची थकविलेली पाणी देयके, म्हाडा वसाहतीमधील सदनिकांचे रुपये १५५ वरुन रु.१०२७ पर्यंत एप्रिल, १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविण्यात आलेले सेवाशुल्क, म्हाडाच्या ५६ वसाहतींचा रखडलेला पुनर्विकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या दुरुस्त न केल्यामुळे पाणी तुंबुन त्या ठिकाणी रोगराई पसरण्याचा निर्माण झालेला धोका, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त व बिगर उपकरप्राप्त सुमारे १४ हजार इमारती, पंतप्रधान आवास योजना इमारत व पुनर्रचना मंडळाच्या व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतंर्गत बांधलेल्या

इमारतीची दुरुस्ती, बीपीटी व बीआयटी च्या जागेवरील धोकादायक इमारती, म्हाडाच्या इमारतींमध्ये ३०० पेक्षा जादा घुसखोर असल्याचे निष्पन्न होणे, मुंबईतील सात रस्ता (आर्थर रोड) येथील मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षिततेसाठी कारागृहापासून ५०० मिटर परिघातील इमारतींचा व झोपडपट्ट्यांचा १० वर्षापासून खुंटलेला पुनर्विकास, वरळी येथील प्रेमनगर, व्ही.पी.नगर, सिध्दार्थ नगर, जिजामाता नगर, मरिअम्मा नगर, इत्यादिंचा गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला पुनर्विकास, मुंबईतील कोळीवाड्यांचे सीमांकन न झाल्यामुळे त्या परिसराच्या विकासासाठी सर्वसामान्य योजना आखण्याची आवश्यकता, मुंबईतील ॲनी बेझंट रोडवरील अटारिया मॉल येथे वाढत्या दहशतीमुळे त्या ठिकाणी तातडीने भुयारी मार्ग तयार करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी, भांडूप (प) व इतर भागात डोंगर, टेकड्यांच्या पायथ्याशी असलेल्या झोपड्यांवर दरवर्षी पावसाळ्यात दरडी कोसळून होणारे अपघात व त्यांचेसाठी एसआरए योजना राबविण्याची आवश्यकता, माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दरम्यान मुंबई शहरात अनेक ठिकाणी लागलेल्या आगींची चौकशी करण्याची आवश्यकता, सुभाषनगर चेंबूर येथे म्हाडा वसाहतीमध्ये विकासकांनी मागील १०-१५ वर्षापासून रहिवाश्यांसोबत करारनामे करुनही अद्यापी पुर्नविकास न करता रहिवाश्यांची केलेली फसवणूक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पाचवी व सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(क) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागाचा सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) परिवहन मंत्री** : "कोकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन

२०१६-२०१७ या वर्षाचा सत्ताविसावा वार्षिक अहवाल लेखा अहवालासह" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) पर्यावरण मंत्री** : "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २००५-२००६ ते सन २००९-२०१० या वर्षांचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "अनुसूचित जाती कल्याण समितीचा नववा अहवाल सादर करणे."**

**चार : "विधानपरिषद नियम समितीचा पहिला अहवाल सादर करणे."**

**पाच : सदस्य- नियम समिती यांचा प्रस्ताव :-**

विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशीमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम २१९(१) व २१९(३) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती नियम २८९ अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत एक दिवसाची करण्यात यावी.

**सहा : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६२** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"सुधागड-पाली (जि.रायगड) येथे नगरपंचायत स्थापन करण्याबाबत होत असलेली मागणी."

(२) **आर्कि.अनंत गाडगीळ, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६१** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील पोलिसांना पुरविण्यात येणाऱ्या बुलेटप्रुफ जॅकेटच्या दर्जाबाबत."

(३) **प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६०** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील मुरबाड रोडवर म्हारळ गावच्या उत्तरेकडील भूभाग हा उल्हास नदीपर्यंत जे.सी.आर.झेड. क्षेत्रात येत असून या ठिकाणी जिन्सी इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने ८४ एकर शेतजमिनीमध्ये अनधिकृतपणे २० ते २२ फूट भराव

टाकलेला असणे."

(४) **डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५१** वर **महिला व बालविकास मंत्री** निवेदन करतील :-

"राजधानी मुंबई व उपराजधानी नागपूर येथे हजारो मुले कुपोषित असून सदर शहरांत मोठ्या प्रमाणात बालमृत्यू होत असणे."

(५) **श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५८** वर **पर्यावरण मंत्री** निवेदन करतील :-

"मुंबईच्या मिठी व अंबरनाथच्या वालधुनी नद्यांचे प्रदूषण झाले असून सदर नद्यांचे नाल्यात रूपांतर होण्यापूर्वीच नद्यांच्या संवर्धनाचा विषय मार्गी लावण्याची गरज."

(६) **श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५९** वर **पर्यावरण मंत्री** निवेदन करतील :-

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील एम.आय.डी.सी. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट तळोजा औद्योगिक (रामके ग्रुप) व सिडको घनकचरा डंपिंग ग्राउंड या दोन्ही कंपन्यांकडून रासायनिक प्रक्रिया करून घातक जैविक कचऱ्याचे विघटन करण्यात येत असणाऱ्या प्रक्रियेमुळे आजूबाजूबाच्या २५ गावांना प्रदूषणाचा सामना करावा लागत असणे."

(७) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७३** वर **कामगार मंत्री** निवेदन करतील :-

"दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी मुंबईतील तारापूरजवळील एमआयडीसी मध्ये नोव्हाफिन रसायन कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्यामुळे लागलेल्या भीषण आगीत १३ जण गंभीर जखमी होऊन ३ जणांचा झालेला मृत्यू."

**सात : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(बुधवार, दिनांक १४ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**

**श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कराड तालुक्यातील (जि.सातारा) मौजा साजूर येथे सन १९६७

मध्ये वसविण्यात आलेले पुनर्वसित गावठाण, मात्र या गावठाणाला अद्याप न मिळालेल्या नागरी सुविधा, अनेक लोकांना शासनाने घरे देण्यासाठी जागा देणे, मात्र या जागेच्या ७/१२ वर त्यांची नोंद नसणे, अनेक लोकांना आपल्या प्लॉटचे निश्चित ठिकाण माहीत नसणे, तसेच येथे अनेक लोकांनी अतिक्रमण करुन बांधलेली घरे, येथील रस्त्यावरही केलेले अतिक्रमण, अनेक कुटूंबाना एकापेक्षा अधिक देण्यात आलेले प्लॉट, अनेक प्लॉटसचे बेकायदेशीर विक्री व्यवहार अनधिकृतपणे करुन त्याची नोंद बोगस फेरफार नंबर टाकून ७/१२ वर करण्यात येणे, अनेकांनी प्लॉटची मागणी करुनही त्यांना अद्याप प्लॉट न मिळणे, यामुळे येथील ग्रामपंचायतीने या पुनर्वसित गावठाणाची प्रत्यक्ष पहाणी करुन चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाच्या आदेशाप्रमाणे व नकाशाप्रमाणे येथील प्लॉटसची मोजणी करुन प्लॉटधारकांना ते देण्याची आवश्यकता, अतिक्रमणे दूर करणे, नागरी सुविधा उपलब्ध करणे, अशी विभागीय अधिकारी, कराड यांच्याकडे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र देऊन करण्यात आलेली मागणी, मात्र, शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील ग्रामस्थांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने या मागणीवर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. हेमंत टकले,** विक्रम काळे, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. सुनिल तटकरे, ॲड. जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. ख्वाजा बेग, रामराव वडकुते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र पोलिस दलात सहायक पोलिस निरिक्षक म्हणून काम करीत असलेल्या श्रीमती अश्विनी बिद्रे-गोरे या पोलिस अधिकारी असलेल्या महिलेचे दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी नवी मुंबईतील कळंबोली येथून अपहरण होणे, त्यांच्या झालेल्या अपहरणाच्या संदर्भात गेल्या २३ महिन्यात शोध घेण्याचा प्रयत्न पोलिस विभागाकडून करण्यात आला असतानाही त्यात पोलिसांना अपयश येणे, या अपहरणाचा शोध घेत असतानाच तपासात ठाणे ग्रामीण पोलिस मुख्यालयातील पोलिस निरिक्षक श्री. अभय कुरुंदकर याचा त्यात हात असल्याच्या संशयावरुन नवी मुंबई पोलिसांनी त्यांना दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी केलेली अटक, या अपहरण प्रकरणात अभय कुरुंदकरांचा बालमित्र महेश फळणीकर याला अटक केल्यानंतर त्याने दिलेल्या जबानीत श्रीमती अश्विनी बिद्रे-गोरे या पोलिस निरिक्षक महिलेची हत्या करुन तिच्या मृतदेहाचे तुकडे करुन ते

काही दिवस फ्रिजमध्ये व त्यानंतर भाईंदर खाडीत फेकून देऊन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न श्री. अभय कुरुंदकर यांनी केल्याचे आपल्या जबानीत सांगणे, या प्रकरणातील अभय कुरुंदकर यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी आपले वजन वापरुन राष्ट्रपती पोलिस पदकासाठी आपली वर्णी लावल्याचे तपासात आढळून येणे, सहायक पोलिस निरिक्षक श्रीमती अश्विनी बिद्रे-गोरे यांच्या झालेल्या अमानुष हत्येच्या संदर्भात पोलिस दलात निर्माण झालेली खळबळ, शासन सेवेत असलेल्या महिलेच्या अशाप्रकारे झालेल्या हत्येमुळे राज्यातील जनतेच्या मनात पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, पोलिस यंत्रणेवरील उडालेला विश्वास व याप्रकरणी जबाबदार असलेल्या अभय कुरुंदकर व इतर सर्व संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी विचारात घेता याप्रकरणी शासनाने उच्च पातळीवरुन चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. संजय दत्त, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे भुमिपुजन व शिलान्यास सप्टेंबर-२०१७ मध्ये जपानचे पंतप्रधान शिंजी आबे आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणे, या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी सुमारे ९८ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार असून राज्याला २४ हजार कोटी रुपयांचा भार उचलावा लागणार असणे, या महत्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पात राज्यात बुलेट ट्रेनचे क्षेत्र ३३ टक्के असून ६७ टक्के गुजरातमध्ये असल्याने गुजरात राज्याला सर्वाधिक लाभ होणे, समान खर्च उभारण्याबाबत राज्यातून होत असलेला विरोध, मुंबई-अहमदाबाद महत्वाकांक्षी बुलेट ट्रेनसाठी मुख्य स्थानक म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलातील ४० हजार चौरस मीटर जागा देण्याचे राज्यशासनाने निश्चित केल्याने सदरील व्यापारी संकुलन बुलेट ट्रेनच्या प्रकल्पामुळे बाधित होणार असणे, बुलेट ट्रेनच्या भूमिगत स्थानकासाठी मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स मधील ०.९ हेक्टर जागा जमिनीवर आणि जमिनीखाली देण्यात येणे, त्याच्या बदल्यात महाराष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राच्या (आयएफएससी) साठी इमारतीच्या पायाचे व भूमिगत पार्किंगचे काम रेल्वेने करुन देण्याची महाराष्ट्र शासनाने घातलेली अट, परिणामी बुलेट ट्रेनचे काम पूर्ण होईपर्यंत वित्तीय सेवा केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरु करता येणार नसणे, परिणामी त्यानंतरच महाराष्ट्राच्या वित्तीय सेवा केंद्राच्या प्रकल्पाला होणारी सुरुवात, वित्तीय सेवा केंद्राचा प्रकल्प अगोदरच अनेक वर्षे रखडलेला असणे, देशाची आर्थिक राजधानी

असलेल्या मुंबईला त्याचा मोठ्या प्रमाणावर बसणारा फटका, आता पुन्हा केंद्र शासनाने नियमांचा निर्माण केलेला अडथळा, केंद्र सरकारच्या निकषानुसार वित्तीय केंद्रासाठी आवश्यक असणारी सलग जागा एमएमआरडीए कडे नसणे, मुंबईच्या वित्तीय सेवा केंद्राच्या मंजुरीस हेतूपुरस्सर करण्यात येत असलेला विलंब, गुजरातची शान वाढविण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या स्वप्नातील आंतरराष्ट्रीय सेवा केंद्राचा दिला जाणारा बळी, याउलट बुलेट ट्रेनसाठी वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे जागा देऊनही, त्याचा काहीही लाभ महाराष्ट्राला न मिळणे, महाराष्ट्र राज्याबाबत केंद्र शासनाचा असलेला दुजाभाव, या प्रकल्पाबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(४) **श्री.रामराव वडकुते, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नवी मुंबई मधील बांधकाम व्यवसायिक सुरेश जैन यांच्याकडे केतन चूग, सुनील भानुशाली, सन्नी लाहोरिया आणि पोलीस उपनिरीक्षक संजय यादव यांनी पाच कोटी रुपयांची लाच मागितली असताना, व्यवसायिक सुरेश जैन यांनी सदर खंडणी न दिल्यामुळे त्यांच्याविरोधात एमआयडीसी पोलीसांनी खोटा गुन्हा दाखल केल्याची बाब दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, केतन चूग, सुनील भानुशाली, सन्नी लाहोरिया आणि पो.उपनिरीक्षक संजय यादव यांनी खंडणी प्रकरणी दबाव वाढविण्यासाठी सुरेश जैन यांचा मुलगा हितेश जैन याला दिवाळीच्या रात्री मुद्दामहून तुर्भे पो.ठाण्यात डांबून त्याला केलेली मारहाण व अत्याचार, गुन्हे शाखेने याबाबत चौकशी केली असता हा गुन्हा खोटा असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये पो.उपनिरीक्षक संजय यादव यांच्यासह एमआयडीसी पो.ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रामचंद्र देशमुख आणि सहायक पो.आयुक्त किरण पाटील यांचा असलेला प्रत्यक्ष सहभाग, गुन्हा उघडकीस येऊनही किरण पाटील यांच्यावर केवळ बदलीची केलेली थातूरमातूर कारवाई, तसेच केतन चूग, सुनील भानुशाली, सन्नी लाहोरिया यांच्यावरही कारवाई करण्यास होत असलेला विलंब, मूळात कायद्याचे रक्षण करणारे पोलीसच खंडणीखोरांशी हातमिळवणी करुन खंडणीसाठी सर्वसामान्य नागरिक व व्यवसायिकांना त्रास देत असल्यामुळे पोलीस खात्यावरील सर्वसामान्यांचा उडालेला विश्वास, खोटया केसखाली पोलीस स्टेशनमध्ये डांबून खंडणी वसूल करण्याची नवीन पध्दत पोलीस खात्यानेच अंमलात आणल्याने निर्माण झालेला संशय, या पोलीस स्टेशन मधील वरिष्ठ पो.निरीक्षक रामचंद्र देशमुख, उपनिरीक्षक संजय यादव, सहायक पो.आयुक्त किरण पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१, नवी मुंबई

सुधाकर पठारे यांच्यासह तुर्भे पो.ठाण्यातील सर्वच दोषी कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांना ताबडतोब कायमस्वरुपी निलंबित करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच केतन चूग, सुनील भानुशाली व सन्नी लाहोरिया यांच्यावरही गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी आणि नाशिक जिल्हयातील इगतपुरी ,खेड,काननवाडी व इतर ठिकाणच्या श्री. चंपकलाल अमिचंद शहा व इतर ४१ शहा कुटुंबियांची शेकडो एकर जमीन ५०० तोळे हून अधिक सोने व ५० किलो हून अधिक चांदीचे वस्तू/भांडी/कुंडी, जडजवाहीर व इतर मालमत्ता हडप केल्याप्रकरणी मुरबाड पोलिस ठाण्यामध्ये श्री नथमल रेखचंद संचेती व खेतीया यांच्याविरुध्द दिनांक १७ मे, २०१६ रोजी गुन्हा कमांक आय-७८ नोंदवून आज दिड वर्षाचा कालावधी लोटूनही अद्याप मुख्य आरोपीस अटक करण्यात आलेली नसणे,सदर प्रकरणातील आरोपीनी श्रीमती चंदनबाई नगीनदास शहा, यांचे अपहरण व खुन करुन मृत्यूपूर्वीच बनावट मृत्यूपत्राच्या आधारे महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल जमिनीची अफरातफर केल्याबाबत शहा परिवारानी दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करुनही सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर आर्थिक गुन्हे शाखामार्फत गुन्हा नोंदविल्यांनतर उपरोक्त प्रकरणी सखोल तपास होणे गरजेचे असतांनाही याबाबत आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे,अदयापी आरोपी मोकाट फिरत असल्याचे निदर्शनास येणे, शेकडो एकर जमिनी हडप केल्याप्रकरणी तसेच श्रीमती चंदनबाई नगीनदास शहा यांचे अपहरण करुन योजनाबध्द खून केल्याप्रकरणी सीआयडीमार्फत सखोल चौकशी करण्याबाबत शासन स्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''

(६) **सर्वश्री. विक्रम काळे,** दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.नरेंद्र पाटील, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, सतिश चव्हाण, अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.अपूर्व हिरे, सर्वश्री.प्रविण दरेकर, परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यामध्ये अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनामुळे दिनांक २ मे,

२०१२ रोजीपासून शिक्षक भरती बंद असणे, त्यानंतरच्या कालावधीत अनेक शाळांमध्ये सेवानिवृत्तीमुळे शिक्षकांची पदे मोठ्या संख्येने रिक्त होणे, सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ च्या संच मान्यतेत अनेक त्रुटी असणे, त्यामुळे चुकीच्या पध्दतीने मोठ्या संख्येने शिक्षक अतिरिक्त होणे, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न होणे, परिणामी त्यांचे वेतन बंद होणे, त्यामध्ये काही दोष नसणे व यामुळे राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची हजारो पदे रिक्त असणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यामुळे शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बीड जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालय, हाळंम, ता. परळी व नुतन डोंगरेश्वर विद्यालय, डोंमरी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. एन.एम. नावंदे यांनी सन १९८१ ते १९९० या काळात खोटे दस्तावेज करुन मोठया प्रमाणावर शासकीय अनुदानाच्या रक्कमेचा अपहार केल्याची बाब निदर्शनास येणे, सदर बाब उघड झाल्यानंतर त्यांच्यावरील कारवाई रोखण्यासाठी त्यांनी मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकारी यांच्या संगनमताने बनावट सही व नावाचे हुबेहुब दस्तऐवज करुन शालेय शिक्षण विभागास फसविले असल्याची बाब निदर्शनास येणे, या बाबीची वस्तुस्थिती माहितीच्या अधिकारांतर्गत विचारलेल्या माहितीतून उघड होणे, त्या माहितीत श्री. नावंदे यांनी सादर केलेली मंत्रालयातील कक्ष अधिकारी श्री. राठोड, शिक्षणाधिकारी श्री. चव्हाण यांच्या स्वाक्षरीची पत्र बनावट असल्याचे व श्री. नांवदे यांच्या समवेत बनावट दस्तऐवज करीत असलेली टोळी कार्यरत असल्याचे उघडकीस येणे, अशाप्रकारे श्री. नावंदे यांनी शासकीय वेतनावरील व विविध अनुदानापोटी देण्यात आलेल्या रक्कमेपैकी कोटयवधी रुपयांच्या रकमेची लूट केली असल्याने या प्रकरणी दोषींची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार पुढे सुरू, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७१ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक २ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(ग) विधानपरिषदेने केलेल्या सुधारणेस सहमती देऊन विधानसभेने आणखी सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे — विचार व संमत करणे.**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७"

---

**(घ) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक १६ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८"

**(२)** "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ८ — महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग

व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८"

**(३)** "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक १० –महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८"

---

दहा : (क) **(मंगळवार, दिनांक १३ मार्च, बुधवार दिनांक १४ मार्च, गुरुवार, दिनांक १५ मार्च, सोमवार, दिनांक १९ मार्च व मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर,** अॅड. अनिल परब, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, रविंद्र फाटक, गिरीशचंद्र व्यास, प्रा.डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री.सुजितसिंह ठाकूर, प्रसाद लाड, चंदुभाई पटेल, डॉ.परिणय फुके, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.अपूर्व हिरे, श्री.मितेश भांगडिया, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"राज्यात मुंबई, कोकण भागात लाभलेला लांब व निसर्गरम्य समुद्र किनारा, परशुरामाची भूमी म्हणून प्रसिध्द आणि समुद्र व डोंगर कपारीने समृध्द कोकण, समुद्राच्या सानिध्यातील रॉक गार्डन, समुद्राखालील प्रवाळे व जीवसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी असलेले स्कूबा ड्रायव्हिंग व स्नार्कलिंग, छत्रपती श्री शिवाजी महाराजांची प्रवित्र स्मृती व शूर वीरांचा पारंपारिक इतिहास असलेले शिवनेरी, रायगड, सिंधुदुर्ग, तोरणा, मुरूड-जंजीरा, लोहगड, विजयदुर्ग, दुर्गाडी इत्यादी पुरातन व ऐतिहासिक किल्ले व जयगड, सिंहगड, प्रतापगड, माऊली इ.गड यांचे संवर्धन करण्याची आवश्यकता, ब्रिटीश व पोर्तुगीज राजवटीत त्यांच्या जहाजांवर प्रखर हल्ले चढवून त्यांना सळो-की-पळो करुन सोडणारे व विदेशी सत्तांना सागरी किनाऱ्यावर मोठे आव्हान निर्माण करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारातील मराठा आरमाराचे प्रमुख दर्यासारंग, सरखेल श्री. कान्होजी आंग्रे यांच्या पवित्र स्मृती जपण्याची आवश्यकता, औरंगाबादमधील जगप्रसिध्द अजिंठा व वेरुळ लेणी व गुंफा अत्यंत जुन्या झाल्या असल्याने त्यांचे संवर्धन व पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने तेथे अत्याधुनिक योजना राबविण्याची आवश्यकता, महाराष्ट्र ही संत व ऋषीमुनींची भूमी असल्याने येथे असलेली सर्व जाती-धर्माची प्रसिध्द धार्मिक स्थळे उदा. पंढरपुरचे विठ्ठल-रखुमाई मंदिर, कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजापुरचे भवानीमाता मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर, अष्टविनायक, शनिशिगनापूर, भारतातल्या १२ ज्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्रातील चार ज्योतिर्लिंगे, नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा, आषाढी एकादशी निमित्त राज्यातून विविध ठिकाणांहून

पंढरपूरच्या वारीकरिता पायी निघणारे व दिवसेंदिवस प्रवास करणारे वारकरी यांना वारीच्या मार्गात सुविधा पुरविण्याकरिता नियोजन करण्याची आवश्यकता, विदर्भातील ताडोबा, नवेगाव, बोर व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय अभयारण्य व तेथील राष्ट्रीय प्राणी, समृध्द वनसंपदा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या बौध्द धर्माच्या दीक्षेच्या माध्यमातून पुनीत झालेली व देशातील बौध्द धर्मियांचे पवित्र श्रध्दास्थान असलेली नागपूरातील दीक्षाभूमी, देशाची औद्योगिक राजधानी म्हणून ख्याती पावलेले मुंबई शहर, मुंबईतील पुरातन कोळी संस्कृती, तसेच फिल्म जगतात बॉलीवूड म्हणून प्रसिध्द असलेली मुंबईची फिल्म नगरी, मुंबई शहरात असलेले जागतिक व्यापार केंद्र, मुंबईतील श्री मुंबादेवी, श्री महालक्ष्मी, श्री सिध्दीविनायक इत्यादी हिंदुची प्रसिध्द दैवते,ख्रिश्चन धर्माची प्रसिध्द देवी माऊंट मेरी, हाजीअलीचा दर्गा, पारशी समाजाची मंदिरे, जैन समाजाचे श्री गोडीजी व श्री शांतीनाथ मंदिर, शिवाजी पार्कवरील चैत्यभूमी इत्यादी राज्यातील नव्हे तर देशभरातील विविध धर्माच्या भाविकांची श्रध्दास्थाने, तसेच गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राईव्ह, नरिमन पॉईंट, बॅलार्ड पिअर, ससून डॉक, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, मुंबई महापालिका इमारत, हुतात्मा चौक, काळाघोडा, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, विज्ञान भवन, एशियाटिक लायब्ररी, मुंबई विद्यापीठ, हॉर्नीमन सर्कल या हेरिटेज वर्गात असलेल्या ऐतिहासिक वास्तू इत्यादींचे संवर्धन व जतन करण्याच्या दृष्टीने विचार होण्याची आवश्यकता, दिल्ली बोट क्लब येथून २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनादिवशी निघणाऱ्या परेडच्या धर्तीवर मुंबईतील मरीन ड्राईव्ह ते नरीमन पॉईट पर्यंत प्रतिवर्षी २६ जानेवारी रोजी काढण्यात येणारी भव्यदिव्य व नेत्रसुखद परेड, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी व शैक्षणिक नगरी म्हणून प्रसध्दि असलेले पुणे शहर, पुणे शहरातील पुरातन व नावाजलेल्या शिक्षण संस्था, पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या नयनरम्य पर्वतरांगा, महाराष्ट्र राज्य पर्यटन क्षेत्रात देशभरातील प्रथम क्रमांकाचे राज्य बनविण्याच्या दृष्टीने व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा वृध्दींगत करण्याकरिता नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखण्याची आवश्यकता ज्यायोगे देशभरातील व जागतिक स्तरावरील पर्यटक महाराष्ट्र राज्यात आकर्षित होऊ शकतील व राज्यातील हॉटेल्स उद्योग, वाहतूक उद्योग यामध्ये वृध्दी होऊन लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल व राज्याच्या महसूलात वाढ होईल या दृष्टीने राज्य शासनाचे पर्यटन धोरण बनविण्याची आवश्यकता, कृष्णा खोरे महामंडळातील जलसिंचन प्रकल्प, कालवे व पुनर्वसनाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता, मत्स्य उत्पादन दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे लहान आणि पारंपारिक मच्छिमार

करणाऱ्यांवर आर्थिक संकट, कोकणातील व समुद्र किनार पट्टीतील मच्छिमारांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याकरिता मत्स्य शेती वाढविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(गुरुवार, दिनांक १५ मार्च, सोमवार, दिनांक १९ मार्च व मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. सतिश चव्हाण, विक्रम काळे, रामहरी रुपनवर, जयवंतराव जाधव, चंद्रकांत रघुवंशी, दत्तात्रय सावंत, अमरसिंह पंडित, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री बाळाराम पाटील, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, अमरिशभाई पटेल, अनिल तटकरे, मोहनराव कदम, आनंद ठाकूर **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"महाराष्ट्र राज्य शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रेसर राहावे म्हणून राज्य शासनाने फक्त वेगवेगळ्या उपाययोजना हाती घेणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता पुर्ण शिक्षणासाठी निर्णय घेणे अपेक्षित असणे, शिक्षण विभागाने शासन निर्णय करण्याचा विक्रमच करणे, इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेणे, त्यानुसार संच मान्यतेच्या निकषात बदल करणे, ऑनलाईन संच मान्यतेत अनेक त्रुट्या असणे, त्याचा फटका शिक्षकांना बसून राज्यात साधारणपणे १३ हजार शिक्षक अतिरिक्त होणे, त्यांचा समायोजनाचा प्रश्न निर्माण होणे, परिणामी त्यांचे वेतन रखडणे, शिक्षक समायोजनामुळे राज्यात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती बंद असणे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातही प्राचार्य व शिक्षकांची भरती बंद असणे, परिणामी त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व शालेय/महाविद्यालयाच्या व्यवस्थापनावर होणे, राज्यात दरवर्षीच्या ११ वी च्या प्रवेशाची समस्या निर्माण होत असून राज्य बोर्डाच्या हजारो विद्यार्थ्यांवर प्रवेशाच्या वेळी अन्याय होत असणे, राज्यामध्ये सुरु असलेल्या सीबीएसई/आयसीएसई शाळांवर राज्य शासनाची कोणतेही नियंत्रण नसणे,

सदर शाळा विद्यार्थ्यांकडून वारेमान फी आकारणी करणे, विद्यार्थी पालक त्याचबरोबर शासकीय अधिकाऱ्यांशी अरेरावी तथा उर्मटपणाची केली जात असलेली वागणूक, इयत्ता बालवाडी ते १२ वी पर्यंतच्या सर्व माध्यमांची तसेच सीबीएसई/आयसीएसई शिक्षण शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली आणणे, जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागात अधिकारी / कर्मचारी यांची हजारो पदे रिक्त असणे, त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होणे, २० टक्के अनुदान सुरु झालेल्या शाळांना पुढील टप्पा प्रचलित दराने देण्याबाबत निर्णय घेण्यास विलंब होणे, दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र म्हणून शासन आदेश निर्गमित केलेल्या शाळांना वेतन अनुदान तरतूद उपलब्ध न करणे, मुल्यांकनास पात्र ठरवून त्याची अनेकवेळा फेरपडताळणी करुन पात्र ठरलेल्या प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या, शाळा तसेच वर्गतुकड्यांच्या अनुदानास पात्र याद्या घोषित न करणे, सन २०१२-१३ मध्ये शाळांना दिलेल्या वर्गतुकड्यांना अनुदानास पात्र ठरविणे, सन २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतू टप्पा अनुदान व विनाअनुदान शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची सतत मागणी होणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची सतत मागणी होणे, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या हिताच्या असलेली कॅशलेश वैद्यकीय सेवा लागू करण्याचा निर्णयास विलंब होणे, विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी मूळ अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल करणे गरजेचे असणे, प्रत्येक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी व्यवस्था करणे गरजेचे असणे, डिजीटल शाळांची निर्मिती करणे व त्याचा अध्यापनात परिणामकारक उपयोग करण्यासाठी सर्व मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळांना मोफत विजपुरवठा करणे, सर्व शासनमान्य मराठी व उर्दु माध्यमांच्या शाळांना मोफत पाठ्यपुस्तके गणवेश, मध्यान्ह भोजन व आयसीटी लॅब उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी चित्रकला व क्रीडा विषयासाठी स्वतंत्र शिक्षकाची गरज असणे, सैनिकी शाळा, के.जी.बी.व्ही. (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय) आदर्श शाळा योजना यांसारख्या पुर्वी सुरु असलेल्या उपक्रमांत असलेल्या अडचणी व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन दरबारी अनेक वेळा प्रयत्न होऊन देखील त्यात काहीच सुधारणा न होणे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील EBC/OBC/S.C/ST/SBC या प्रवर्गातील जवळपास १७ लाख विद्यार्थ्यांची उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शैक्षणिक फी व इतर अनुदानाची असलेली प्रचंड थकबाकी त्यामुळे वैद्यकीय, औषध निर्माण, व्यवस्थापन, अभियांत्रिकी महाविद्यालये आर्थिक अडचणीत सापडलेली

असणे, शालेय, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा, राज्यात सुशिक्षित बेरोजगार तरुणांची वाढत चाललेली संख्या, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्यांचे आमिष दाखवून मॅग्नेटीक महाराष्ट्र, मेक इन महाराष्ट्र, स्टार्ट अप महाराष्ट्र आदी फसव्या घोषणा करुन सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या समोर नोकऱ्यांचे मृगजळ दाखविण्याचा केलेला प्रयत्न, राज्य शासनाच्या अनेक कार्यालयांमध्ये अ ते ड श्रेणीतील पदे रिक्त असूनही त्यावर नवीन उमेदवारांच्या नियुक्त्या न करणे, पोलीस शिपाई भरतीत देखील मोठ्या प्रमाणावर पदांची संख्या गेल्या दोन वर्षात कमी केलेली असणे, खाजगी व असंघटित क्षेत्रात, अत्यल्प वेतन, नोकरीतील अस्थैर्य, कामांचे तास, महिलांची सुरक्षितता यामध्ये तरुण/तरुणींचे होणारे शोषण, यामुळे बेरोजगार तरूणांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण होणे, शासनाने जाहीर केलेल्या एकूण प्रकल्पांपैकी केवळ ४० ते ४५ प्रकल्पच कार्यरत होऊन अपेक्षेएवढा रोजगार निर्माण झालेला नसणे, यामुळे बेरोजगार तरुणांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेले अविश्वासपूर्ण वातावरण, नैराश्यग्रस्त बेरोजगार युवकांनी आत्महत्येचा प्रयत्न केला असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र न देणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने रिक्त पदांची जाहिरात तात्काळ काढण्याची मागणी होत असणे, वेगवेगळ्या पदासाठी एकाच वेळी जाहिरात काढल्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संधी कमी होणे, यासाठी पद भरती जाहिरातीचे योग्य नियोजन करण्याची मागणी होत असणे, तसेच नोकर भरतीवर घातलेल्या बंदीमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या परिक्षार्थींमध्ये पसरलेला असंतोष व त्यांनी काढलेले मोर्चे, विदर्भ व मराठवाड्यात छोटे मोठे उद्योग व्यवसाय सुरु करुन बेरोजगार तरुणांना रोजीरोटी उपलब्ध करुन देण्याची संधी असतानाही शासन त्या दृष्टीने नियोजन नसणे, देश पातळीवरील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमध्ये मराठी टक्का वाढविण्यासाठी परिक्षार्थींना आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात शासनाकडून होत असलेली चालढकल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात होत असलेला भ्रष्टाचार, कुलगुरुंचा मनमानी कारभार, कायद्याला बगल देऊन विद्यापीठाच्या निवडणुकात केलेला गैरवाजवी हस्तक्षेप, प्राध्यापक नियुक्तीत होणारी अनियमितता, यामुळे विद्यार्थी, प्राध्यापकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, मुंबई विद्यापीठांच्या विविध परिक्षांचे निकालाचे पुर्नमुल्यांकनाचे रेंगाळलेले काम, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिर्घकालीन प्रलंबित असलेल्या मागण्या, इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षांचे प्रश्नपत्रिका फुटण्याचे घडत

असलेले प्रकार, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने शासनाला येत असलेले अपयश, राज्य सरकारच्या तसेच केंद्र सरकारच्या विविध कार्यालयामध्ये मराठी भाषेचा कार्यालयीन वापरात उपयोग करण्यासंदर्भात परिपत्रके काढण्याशिवाय ठोस उपाययोजना न करणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ग) (मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**प्रा.डॉ.तानाजी सावंत,** श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.अनिल परब, सर्वश्री.प्रविण दरेकर, गोपीकिसन बाजोरिया, परिणय फुके, रविंद्र फाटक, मितेश भांगडिया, विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.विनायक मेटे, गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.प्रसाद लाड, चंदुभाई पटेल, रामनिवास सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाच्या अपूर्ण असलेल्या प्रकल्पांना पुरेसा निधी उपलब्ध करणे, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलांमुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यातील पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून प्रकल्पग्रस्तांचे परिपूर्ण पुनर्वसन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रम राबविणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक सिंचन महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत करावयाची कामे, कृष्णा खोऱ्यातून मराठवाडयासाठी २८ टीएमसी पाणी मिळण्यासाठी तात्काळ पाऊले उचलण्याची गरज, पिण्याचे पाणी व औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, कालव्याऐवजी पाईप लाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुप्रमा घेणे, कालव्याची व उपसा सिंचन योजनांची कामे करुन शेतक-यांना जलसक्षम करणे, उपसा सिंचन योजनेवर सौरऊर्जापंप बसविणे, लाभक्षेत्राबाहेर होणारी पाण्याची चोरी रोखणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैनगंगा व नळगंगा जोड प्रकल्प व कन्हान-वर्धा बोगद्याद्वारे नदीजोड प्रकल्पाचा तातडीने अभ्यास करुन ते कार्यान्वित करणे, पेणटाकळी, खडकपूर्णा, जिगाव व गोसीखुर्द इ. प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम आखून कार्यान्वित करणे, राज्यातील बहुतांश पाझर तलाव सन १९७२ ते १९८० च्या दुष्काळ दरम्यान झालेले असल्याने त्याची सिंचन क्षमता तपासून त्यांची पुनर्बांधणी करण्याची

आवश्यकता, शिवकालीन बारव, पायविहिर, चौकोनी विहिर अशा प्रचीन जलस्त्रोतांचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता, हिंगोली जिल्हयातील पूर्णा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यासाठी व ज्या-ज्या प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले आहे त्या-त्या प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता तात्काळ देऊन काम सुरु करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजना अधिक गतीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, राज्यातील जलदगतीने पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा पंतप्रधान सिंचन प्रकल्प योजनेत समावेश केला असणे, २००८ मध्ये कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा व दीड लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने तसेच, आदिवासी वनजमिनींचे सर्व दावे ६ महिन्यांत निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागासह राज्य शासनाच्या सर्व विभागांनी औषधी आणि वैद्यकीय उपकरणाची खरेदी ही हाफकिन बायो फार्मास्युटिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत करण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, महिला व बाल विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, गृह, आदिवासी विकास विभागासह जिल्हा परिषद व इतर विभागांना लागणारी औषधे एकत्रित खरेदीमुळे शासनाच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, हाफकिन या एकाच यंत्रणेकडे औषध खरेदीचे अधिकार दिल्यामुळे औषधे व वैद्यकीय उपकरणाचे दर आणि मानके यामध्ये एकसूत्रता न रहाणे, त्यामुळे दर्जा व गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होणार असल्याने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"औरंगाबाद जिल्ह्यात बालगृह चालवणाऱ्या १८ स्वयंसेवी संस्था असून शासनाकडून मिळणारे ८० टक्के अनुदान त्यांना मिळालेले नसणे, संस्थांना बालगृहाचा खर्च पेलणे अवघड झाले असून काही संस्थाचालक कर्जबाजारी झालेले असणे, महिला व बालकल्याण विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे कारण देऊन वेळेवर अनुदान न देणे, त्यामुळे संस्थाचालकांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयुक्त, पुणे यांची भेट

घेऊन व्यथा मांडणे, तथापि प्रत्येक वेळेस बालगृहाची चौकशी करण्याचे कारण दाखवून शासकीय अनुदान थांबविले जाणे व वेळेवर न देणे, संस्थेस दैनंदिन व्यवहाराकरीता आर्थिक अडचणी येत असल्याने शासकीय अनुदान त्वरीत मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.